# संपादकीय

## अमेरिकेचा धार्मिक स्वातंत्र्य अहवाल आणि आपण

साधारणतः २००० सालापासून १९९८च्या आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य कायद्यानुसार अमेरिकेने विविध देशातीत धार्मिक लेखा-जोख्याचा आढावा घेऊन धार्मिक स्वातंत्र्य अहवाल प्रकाशित करायला सुरुवात केली. आत्तापर्यंत त्यांचे १९ अहवाल प्रसिद्ध झाले आहेत. २०१९च्या अहवालात ९ आयुक्तांची नावे आहेत त्यात अनुरिमा भार्गव व अँडी ख्वाजा ही दोन भारतीय नावे आढळतात. यात २८ देशांचा धार्मिक स्वातंत्र्य अहवाल आला आहे. भारताच्या बाबतीत हा अहवाल म्हणतो की, भारताला धार्मिक सलोख्याची दीर्घ परंपरा असताना आता मात्र धार्मिक स्वातंत्र्याचा आलेख उत्तरोत्तर घसरत आहे. भारतीय राज्याघटनेचे या अहवालात कौतुक आहे. भारतीय संविधानाने भारतीय लोकांना धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार आणि हमी दिली आहे. तसेच देशाची स्वतंत्र न्यायपालिका नेहमीच धार्मिक अल्पसंख्याक समुदायांना न्यायशास्त्रानुसार संरक्षण पुरवत असते असे म्हंटले आहे. अहवाल पुढे म्हणतो काही घटक धार्मिक अल्पसंख्याकांविरोधात हिंसाचार भडकवण्यास सातत्याने मोठी मदत करत आहेत. अल्पसंख्याक आणि निम्न जातींविरुद्ध हिंसा करणे, धमकावणे आणि छळ सार्वजनिकपणे केला जात आहे. यात हिंदू जमावाकडून गोहत्या हा प्रधान मुद्दा बनवण्यात आला आहे. तसेच त्याला कायद्याचे कवच पुरविण्यात शास्ते यशस्वी झाले आहेत. भारताच्या संविधानातील कलम ४८ अंतर्गत, गायींची कत्तल प्रतिबंधित आहे. त्यानुसार, भारतामध्ये २९ पैकी २१ राज्यांमध्ये गोहत्येच्या विरोधात कायदा आहे. गोहत्येच्या गुन्ह्यासाठी सहा महिन्यांपासून १४ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा विविध स्वरूपात सांगण्यात आल्या आहेत. या कायद्याचा आधार घेऊन तथाकथित गोभक्तांनी मे २०१५पासून १००हून अधिक हल्ले केले, त्यात ४४ जणांचा मृत्यू आणि सुमारे ३०० लोक जखमी झाले आहेत. केवळ २०१८मध्ये, गोरक्षणाच्या नावाखाली झालेल्या झुंडहत्यांमध्ये किमान १३ जण ठार झाले आणि ३१ घटनांमध्ये ५७ जखमी झाले.

काही दूध उत्पादक लोकांनाही गोहत्येच्या संशयावरून सार्वजनिकरित्या मारहाण केल्याची उदाहरणे या अहवालात आहेत. जुलै २०१८मध्ये राजस्थानमध्ये दूध डेअरी उत्पादक अकबर खान यांचा जमावाच्या हल्यात मृत्यू झाला. डिसेंबर २०१८मध्ये उत्तर प्रदेश येथे जमावाकडून पोलीस अधिकारी सुबोध कुमार सिंग यांची जमावाकडून हत्या झाली. अशा घटनात धार्मिक अल्पसंख्याक आणि खालच्या जाती बळी पडल्या आल्या आहेत.

२०१८मध्ये अंदाजे एक तृतीयांश राज्य सरकारांनी गाईच्या कत्तल कायद्यांविरुद्ध भेदभावपूर्वक अंमलबजावणी केली आहे. यात मुख्यत्वे मुस्लिमांना लक्ष्य करणाऱ्या हिंसाचाराच्या घटना प्रधान आहेत. चामडयाचे व्यवसाय किंवा काम करणाऱ्या दलितांविरोधीही अशाच हिंसा होत आहेत. ख्रिचन धार्मिक अल्पसंख्याक गटांविरुद्ध भेदभावाने अंमलबजावणी केली जात आहे. त्यांच्यावरही हल्ले घडवून आणले जात आहेत. भारतीय सर्वोच्च न्यायालयाचा हवाला देऊन अहवालात म्हटले आहे, काही राज्य सरकारे धार्मिक हिंसाचार थांबविण्यासाठी पुरेसे प्रयत्न करत नाहीत, तर अत्यल्प घटनांमध्ये जमातवादी हिंसाचारात गुंतलेल्या गुन्हेगारांना कायद्याचा सामना करावा लागलेला आहे. अलीकडील वर्षांत

मोठ्या संख्येने झालेल्या हल्ल्यांना बळी पडलेल्यांना न्याय मिळाला नाही आणि धार्मिक अल्पसंख्यकांविरुद्ध केलेल्या हल्ल्यांच्या गुन्हेगारांना शिक्षा झाली नाही. भारतातील काही शास्ते लोक गुन्हेगाराविरुद्ध पुरेशा क्षमतेने काम करत नाहीत. यासाठी या अहवालात काही शिफारशी केल्या आहेत. धार्मिक हिंसाचाराच्या घटना रोखण्यासाठी आणि हल्लेखोरांना शिक्षा देण्यासाठी राज्य आणि केंद्रीय पोलिसांची क्षमता वाढविणे, तसेच बळी पडलेल्यांच्या नातेवाईकांना, साक्षीदारांना आणि त्यांच्या मालमत्तेला तसेच पूजा स्थळांना संरक्षण द्यावे. पण भारत सरकारच्या प्रवक्त्यांनी अमेरिकेचा धार्मिक स्वातंत्र्य अहवाल खोटा ठरवून त्यांनी सुचवलेल्या उपायांना केराची टोपली दाखवत आम्ही 'धर्मनिरपेक्ष' आहोत याचाच पोकळ उच्चार करण्यात धन्यता मानली आहे.

●


**परिवर्तनाचा वाटसरू मिळण्याची ठिकाणे**

## मीडिया ॲडस्

द्वारा राहूल वाघमारे, विष्णू कॉंप्लेक्स,
हॉटेल ताज पाटील समोर, नांदेड
भ्र. ९८६००८३१३४

## हरिष बुक स्टॉल

न्यू बस स्टँड, अकोला
भ्र. ९८२२२३३२६४

## पीपल्स बुक हाऊस

मेहेर हाऊस,
१५, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट
मुंबई ४११००१
दू. ०२२ २२८७३७६८

## युनिक बुक्स

युनिक ॲकॅडमी, देवीदास आर्केड, पंचवटी चौक, मोर्शी रोड,
अमरावती
दू. ०७२१ २६६७८१५

## अथर्व पब्लिकेशन्स

तळमजला, ओम हॉस्पिटल,
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, दत्त कॉलनी,
जळगाव-४२५००१
दू. ०२५७-२२३९६६६

## माणगावकर एजन्सी

५३८ अ, शनिवार पेठ, किबे लक्ष्मी थिएटरसमोर,
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११०३०
भ्र. ७०२००४४६५५